**एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन**

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ,शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

**अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका एक — विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण**

दिनांक : ३० डिसेंबर, २०१८

[ वेळ : सकाळी १०.३० ते दुपारी १.१५ ]

**( तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून )**

**(एकूण गुण: १००)**

---

सूचना :- (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.
(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करण्यात येऊ नये.

**गुण**

**प्रश्न क्र.१** खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर सुमारे २० ते २५ ओळींत लिहा. **१०**

(अ) योगी पुरूष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात हे स्पष्ट करा.

(ब) रा. ग. जाधव यांनी दिलेल्या शालींचा उपयोग भिक्षेकऱ्याने कशा पद्धतीने केला.

**प्रश्न क्र.२** पाठांच्या आधारे खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे सुमारे १० ते १५ ओळींत लिहा. **२५**

(अ) ‘उपास’ या पाठामध्ये भिकोबा मुसळेने पंतांचे कसे समर्थन केले ?

(ब) ‘आधी केले मग सांगितले’, या उक्तीची यथार्थता स्पष्ट करा.

(क) तपोवनातील स्त्रिया व मुलींना अब्दुल देवदुतासारखा का वाटे ?

(ड) सुमितने तयार केलेल्या ॲपचे वर्णन करा.

(इ) डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी संस्कार केंद्र कोणाला म्हटले आहे ? व का ?

(फ) ‘लेखकाला वाघिणीतील आईची झलक जाणवली’ हे विधान जंगल डायरी या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

**प्रश्न क्र.३** कवितांच्या आधारे खालीलपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे सुमारे १० ते १५ ओळींत लिहा. **१५**

(अ) संत नामदेवांनी परमेश्वराकडे केलेली विनंती सोदाहरण स्पष्ट करा.

(ब) ‘दु:ख पेलावे आणि पुन्हा जगावे’ या ओळीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

(क) पृथ्वीला वाचवण्यासाठी काय करावे असे अंजली कुलकर्णी यांना वाटते ?

(ड) झाडासारखे घट्ट पाय रोवण्यासाठी माणसाने काय काय करावे असे जॉर्ज लोपीस यांनी सांगितले आहे ?

गुण

**प्रश्न क्र.४** खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. १०

(अ) उत्कंठा लागणे

(ब) अनुमती मिळणे

(क) आयुष्याचा सार्थक होणे

(ड) वाटचाल करणे

(इ) अभिनंदन करणे

(फ) तुळशीपत्र ठेवणे

**प्रश्न क्र.५** खालील मराठी शब्दसमूह आणि त्यांचे इंग्रजी अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा. १०

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| (अ) अंमलबजावणी करणे | (१) To go on a strike |
| (ब) आकाशाला भिडणे | (२) To lead |
| (क) वाट धरणे | (३) To implement |
| (ड) एकटक पाहणे | (४) To come to senses |
| (इ) आघाडीवर असणे | (५) To be disgraced |
| (फ) फजिती होणे | (६) To reach great heights |
| (ग) आनंदविभोर होणे | (७) To get tired |
| (ह) दम लागणे | (८) To stare continuously |
| (य) हरताळ पाळणे | (९) To be overjoyed |
| (र) भानावर येणे | (१०) To go away |

**प्रश्न क्र.६** **(अ)** खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचे लिंग बदला. ५

| | | |
|---|---|---|
| (१) लेखक | (२) मोर | (३) श्रीमान |
| (४) गायक | (५) मावशी | (६) शिष्य |

**(ब)** खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा. ५

| | | |
|---|---|---|
| (१) समर्थ | (२) भेद | (३) समता |
| (४) उष्ण | (५) न्यायी | (६) व्यवस्थित |

**प्रश्न क्र.७** **(अ)** खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांपासून विशेषण तयार करा. ५

| | | |
|---|---|---|
| (१) संपादक | (२) साहित्य | (३) विज्ञान |
| (४) विचार | (५) माध्यम | (६) अर्थ |

**(ब)** कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये पुन्हा लिहा. **गुण ५**

(१) यावर तो शालीन कवी मनापासून हसला. (उद्‌गारार्थी करा.)

(२) माझ्या मनात क्रीकेटचे बिज पेरले गेले आणि उगवले ते असे. (लेखन नियमानुसार वाक्य शुद्ध करून लिहा.

(३) पायाला चिकटलेला कार्बन धुवायला हवा. (आज्ञार्थी करा.)

(४) हे सांगायला ॲपची गरज नाही. (प्रश्नार्थी करा.)

(५) साऱ्यांचे डोळे पाणावले. (वाक्यातील काळ ओळखा.)

**प्रश्न क्र.८** कंसात दिलेल्या पर्यायांमधून वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्दसमूहाची निवड करा. **१०**

(होमी भाभा, चांदणं, आविष्कार, कॅक्टस, गुरूजींवर, शालीनता, जीवनेच्छा, शिक्षक, सुरक्षेबद्दल, दोन)

(अ) शालीमुळे ----------- येत असेल तर मी कर्जबाजारी होईन.

(ब) ----------- यांनी भारतातील अणुसंशोधनाचा पाया घातला.

(क) एखाद्या वस्त्राचा एकाएकी रंग उडून जावा तशी त्याची ----------- एकाएकी उडून गेली.

(ड) निळ्याशार तुकड्यावर ----------- उमलल्याचा त्यांना भास झाला.

(इ) आई हीच प्रत्येक मुलाची पहिली ----------- असते.

(फ) कल्पनाचा सुंदर ----------- कवितेत असतो.

(ग) वाघीण पिल्लांच्या ----------- भलतीच दक्ष असते.

(ह) वाळवंटी प्रदेशाचा ----------- हा अगदी खास प्रतिनिधी आहे.

(य) आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो ----------- !

(र) निरंजनाची ----------- अपार श्रध्दा होती.

*-*-*-*-*-*-*-*-*

एतदर्थ मंडळ ( मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन
भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद**

दिनांक ३० डिसेंबर, २०१८

[ वेळ : दुपारी २.१५ ते सायंकाळी ४.४५ ]

**( तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)**

**(एकूण गुण : १००)**

---

सूचना :- (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.
(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.
(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.
(४) प्रश्नपत्रिकेवर कोणत्याही प्रकारचे लेखन करण्यात येऊ नये.

**गुण**

प्रश्न क्र. १. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत निबंध लिहा. २०

(अ) वाढती बेरोजगारी : एक समस्या

(ब) योग — एक जीवन पद्धत

प्रश्न क्र. २. खालीलपैकी कोणत्याही एका विषयाच्या संदर्भात सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा २०

(अ) 'विजेची बचत काळाची गरज' याबाबत आपले विचार व्यक्त करा.

(ब) शहरीकरण एक समस्या ?

प्रश्न क्र. ३. खालीलपैकी कोणत्याही ३ बाबी तयार करा. ३०

(अ) सावित्रीबाई फुले यांचा दिनांक ३ जानेवारी हा जन्मदिवस ' भारतीय स्त्री मुक्ती दिन' म्हणून साजरा करावा याकरिता परिपत्रक तयार करा.

(ब) झोपडपट्टी भागातील बालकांच्या शैक्षणिक विकासासाठी कोणकोणते प्रकल्प तयार करता येतील व त्यांची अंमलबजावणी कशी करावी लागेल, याविषयी टिप्पणी तयार करा.

(क) ॲसिड हल्ला, लैंगिक अत्याचार यामध्ये बळी पडलेल्या महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी मनोधैर्य योजना सुरू करण्याबाबत शासकीय निर्णयाचे प्रारूप तयार करा.

(ड) डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर हा वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्याबाबत परिपत्रक तयार करा.

प्रश्न क्र. ४. (अ) खालील मराठी शब्दसमूह आणि त्यांचे इंग्रजी अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा. १०

| 'अ' गट | | 'ब' गट | |
|---|---|---|---|
| (१) | Business Manager | (अ) | कार्यालय लेखापाल |
| (२) | Judgment writer | (ब) | उपविभागीय दंडाधिकारी |
| ३) | Officer Accountant | (क) | आरोहक |
| (४) | Senior Physicist | (ड) | द्वारपाल |
| (५) | Sub – Divisional magistrate | (इ) | व्यवसाय व्यवस्थापक |
| (६) | Mountaineer | (फ) | क्षेत्रपाल |
| (७) | Welfare officer | (ग) | नैमित्तिक चालक |
| (८) | Ranger | (ह) | कल्याण अधिकारी |
| (९) | Gate-keeper | (य) | न्यायनिर्णय लेखक |
| (१०) | Casual Operator | (र) | वरिष्ठ भौतिकीतज्ज्ञ |

प्रश्न क्र. ५. पुढील वाक्प्रयोगासाठी मराठी पर्याय द्या. (कोणतेही पाच ) ५

(अ) To look after
(ब) To have plans
(क) To compete
(ड) To confess
(इ) To snatch away
(फ) To go away

प्रश्न क्र. ६. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. १५

When a Bill has been passed by the Legislative Assembly of a State or, in the case of a state having a Legislative Council, has been passed by both Houses of the Legislature of the State, it shall be presented to the Governor shall declare either that he assents to the Bill or that he withholds assent therefrom or that he reserves the Bill for the consideration of the President, Provided that the Governor may, as soon as possible after the presentation to him of the Bill for assent, return the Bill if it is not a Money Bill together with a message requesting that the House or Houses will reconsider the Bill or any specified provisions thereof and, in particular, will consider the desirability of introducing any such amendments as he may recommend in his message and, when a Bill is so returned, the House or Houses shall reconsider the Bill accordingly, and if the Bill is passed again by the House or Houses with or without amendment & presented to the Governor for assent, the Governor shall not withhold assent therefrom.

----------------------